**मटा अँकर** रविवारी समर्थ रामदासांची तपोभूमी अनुभवण्याची संधी

# 'मटा' हेरिटेज वॉक समर्थांच्या टाकळीत !

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

नंदिनी व गोदावरीच्या संगमात उभे राहून 'श्रीराम जयराम जयजय राम' या मंत्राचा तेरा कोटी जप, दररोज १२०० सूर्यनमस्कार करून टाकळीला बलोपसनेचे केंद्र अशी ओळख निर्माण करून देणारे समर्थ रामदास रूपी योगी नाशिकला लाभले. नाशिकच्या धर्मभूमीला तपोभूमीची जोड देणाऱ्या समर्थांचे अनेक अज्ञात पैलू महाराष्ट्र टाइम्सतर्फे रविवारी, २५ सप्टेंबरला होणाऱ्या 'मटा' हेरिटेज वॉकमधून उलगडले जाणार आहेत.

१६०६ साली रामनवमीच्या दिवशी जालना जिल्ह्यातील जांब या गावी समर्थ रामदासांचा (नारायण ठोसर) जन्म झाला. तरुणाईकडे झेपावत असलेले नारायण मध्यम उंचीचे. मजबूत बांधा, गौरवर्ण, तेजस्वी नजर, कपाळावर



लहानसे टेंगुळ असे त्यांचे रूपरंग होते. लग्नासाठी बोहल्यावर उभे राहिल्यावर भटजीच्या तोंडून 'सावधान' हा शब्द ऐकताच ते बोहल्यावरून पळाले; ते थेट नाशिकमध्ये आले. समर्थ इ. स. १६२१ ते १६३३ असे १२ वर्षे टाकळी गावात राहिले. येथेच त्यांनी तपश्चर्या व कठोर साधना केली. टाकळी येथील समर्थांनी पहिला मठ स्थापन केला. रामदास स्वामींना पहिला शिष्य उद्धव महाराज टाकळी येथील मठातच भेटले. समर्थांनी स्वत:च्या हातांनी साकारलेला गोमयी




मिश्रणाची श्रीमारुतीरायाची मूर्ती, मठातील काळ्या पाषाणातील तसेच लागडी मूर्ती अन् पेशवाईचा इतिहासही वैशिष्ट्यपूर्ण आहे.

अशा अनेक वैशिष्ट्यांमुळे टाकळी समर्थमय झाली आहे. समर्थांचे साहित्य वैभवही 'मटा'च्या हेरिटेज वॉकमधून अनुभवायला मिळणार आहे. समर्थ्यांच्या तपोभूमीबद्दल अन् अज्ञात पैलूंबद्दल मठाचे विश्वस्त सुधीर शिरवाडकर, ज्योतीराव खैरनार, प्रकाश पवार, अॅड. दिलीप कैची, अॅड. विजया माहेश्वरी, मकरंद जोशी हेरिटेज वॉकमध्ये सहभागी झालेल्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

## नावनोंदणी आवश्यक

टाकळी गावातील समर्थांच्या मठासमोर रविवारी (दि. २५) सकाळी ९.३० वा. एकत्रित जमायचे आहे. 'मटा' हेरिटेज वॉकमध्ये सहभागी होण्यासाठी खालील क्रमांकावर आपले नाव व सोबत येणाऱ्यांची संख्या एसएमएस करावी.

**अधिक माहितीसाठी संपर्क : रमेश पडवळ, ८३८००९८१०७.**



## मठाधिपतींच्या समाधी दुर्लक्षित

समर्थांनी स्थापन केलेल्या पहिल्या मठ म्हणून टाकळीतील मठ ओळखला जातो. समर्थ बारा वर्षांच्या तपश्चर्यनंतर नाशिक सोडून जाताना त्यांनी हा मठ त्यांचे पहिले शिष्य उद्धवस्वामी महाराजांकडे सोपविला. त्यानुसार उद्धवस्वामी हे टाकळीतील मठाचे पहिले मठाधिपती होते. त्यांच्यासह या मठाला एकूण नऊ मठाधिपती लाभले. यांच्या समाध्या मठापासून काही अंतरावर गोदाकाठी आहेत. मात्र, त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. या समाध्यांचा परिसर स्वच्छ करावा तसेच नाशिकचा वारसा जपला जावा यादृष्टीने जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज आहे.